**<u>महत्वाचे पत्र</u>**

जा.क्र.कृ या.उ.अ./गुनि-५/मासू.(घ-३ व ४)/१६८/२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Email ID – ddaqc5@rediffmail.com
दिनांक - १७/१०/ २०१४

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी ---------------------------(सर्व)**
**२) विभागीय कृषि सहसंचालक -----------------(सर्व)**
**३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी --------------(सर्व)**
**४) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद ---------(सर्व)**

**विषय : कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत घटक क्र. ३ व ४ च्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ :** १. शासन पत्र क्र. :- कृयांउ-१०१४/प्र.क्र१२४/४अे, दिनांक १७ ऑक्टोबर २०१४
२. आयुक्तालयाच्या मा.सू. क्र.कृ.यां.उ.अ./गुनि-५/मा.सु/घ-४/१३७/२०१४, दि. ११/०९/२०१४
३. आयुक्तालयाच्या मा.सू. क्र.कृ.यां.उ.अ./गुनि-५/मा.सु/घ-३/१६६/२०१४, दि. १४/१०/२०१४

सन २०१४-१५ मध्ये कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत राज्यात राबविण्यात येत असलेल्या कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या घटक-३ व घटक-४ बाबत मार्गदर्शक सुचना शासन मान्यतेने यापूर्वी आयुक्तालयीन स्तरावरुन संदर्भीय पत्रानुसार निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

संदर्भिय शासन पत्र दिनांक १७/१०/२०१४ अन्वये सुचीत केल्यानुसार घटक-३ "कृषि यंत्र सामुग्री व उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य (कृषि औजारे/ उपकरणांचा अनुदानावर पुरवठा)" बाबत यापूर्वीच्या मार्गदर्शक सुचनांनुसार देण्यात आलेल्या जिल्हानिहाय भौतीक व आर्थिक लक्षांकाच्या अनुषंगाने स्थानीक परिस्थितीनुसार शेतक-यांच्या मागणीप्रमाणे औजारांचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने सदर घटकांतर्गत विविध बाबींच्या लक्षांकात बदल करण्याची सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना मुभा देण्यात आली आहे. तथापि, सदर बदल मंजुर अर्थिक तरतुदीच्या मर्यादेतच करणे बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, घटक -४ "भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविधा पुरविण्यासाठी कृषि औजारे बँन्केची स्थापना करणे" बाबत संबंधीत लाभधारकास त्यांच्या पसंतीप्रमाणे औजारे निवडीची मुभा राहील.

मात्र, सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी मंजुर अर्थिक मर्यादेतच करणे संबंधीतांना बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी. याबाबत मार्गदर्शक सुचनांतील इतर बाबी जशाच्या तशा लागू राहतील.

**कृषि संचालक (नि. व गु.नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

प्रत माहीतीस्तव सविनय सादर -

**१. मा. अपर मुख्य सचिव,** कृषि व पणन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**२. मा. आयुक्त कृषि,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
**३. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादीत, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेनाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५